महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील सरळसेवेतील रिक्त पदे १००% भरण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक DAHD-१२०२४/११/२०२५-AH२ (१३९२०१९)**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२
**दिनांक :- १६ मार्च, २०२६**

वाचा :- १) शासन निर्णय कृषी व पदुम विभाग क्रमांक मपवि २०१८/प्र.क्र.४०/पदुम २(माफसू), दिनांक ०१ डिसेंबर, २०२२
२) शासन निर्णय कृषी व पदुम विभाग क्रमांक DAHD-१२०२४/०१/२०२५-AH-२ (१३५३४८५) दिनांक २६ सप्टेंबर २०२५
३) भारतीय पशु चिकीत्सा परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. D.O. No ८-१/२०२६-VCI/३२०८ दिनांक २१ जानेवारी २०२६ चे पत्र
४) उपसमितीच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे वित्त विभाग क्र पदनि २०२६ /प्र.क्र.०६/आपूक, दि. २४ फेब्रुवारी, २०२६ चे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. १ येथील विभागाच्या दिनांक ०१/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंधानुसार शिक्षक संवर्गातील ७२९ व शिक्षकेत्तर संवर्गातील ११४२ असे एकूण १८७३ नियमित पदे आणि बाहययंत्रणेव्दारे घ्यावयाची ४९ सेवांना मान्यता प्राप्त आहे. याव्यतिरीक्त अकोला, अहिल्यानगर, बारामती, जि. पुणे आणि परळी, जि. बीड येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि मौजे मोर्शी, जि. अमरावती येथे नवीन मत्स्य विज्ञान महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पदसंख्येत वाढ झाली आहे.

२. वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०/०९/२०२२ अन्वये सुधारित आकृतीबंधातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळता, अन्य संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त असलेली पदे ५० टक्के भरण्याची अनुमती देण्यात आली आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील सरळसेवेतील रिक्त पदे १००% भरण्यास मान्यता दिली आहे. सदर बाब विचारात घेवून विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील सरळसेवेतील रिक्त पदे १००% भरण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

३. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय/ दुग्धतंत्रज्ञान /मत्स्य विज्ञान महाविद्यालये/ प्रक्षेत्रे/ कृषि विज्ञान केंद्र यामधील शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२२ रोजीच्या आकृतीबंधानुसार व तद्नंतर मंजूर करण्यात आलेल्या पशुवैद्यकीय/ मत्स्य विज्ञान महाविद्यालयामधील मंजूर पदांपैकी सरळसेवेतील रिक्त असलेली १०० टक्के भरण्यास पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर पदे भरण्यसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ परिनियम २००२ मध्ये शिक्षक संवर्गातील पदांची निवड समिती व शैक्षणिक अर्हता व इतर बाबींचे अनुपालन करण्यात यावे.
२) मा. राज्यपाल महोदय यांनी दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करण्यात यावे.
३) विद्यापीठाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर रिक्त पदे पारदर्शकपणे पार पाडण्याच्या अनुषंगाने दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय, अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उपसमितीच्या दिनांक ०६/०२/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३१६११५७१५८३०१ असा आहे. हा आदेश डिजीजल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.03.16 11:58:39 +05'30'

**(नि.भा. मराळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
२. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर,
३. नियंत्रक (वित्त व लेखा) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर,
४. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
५. लेखा अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
६. वित्त विभाग आपुक/व्यय -२ / अर्थसंकल्प -१५, मंत्रालय, मुंबई -३२,
७. निवड नस्ती